FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): पिंपरी-चिंचवड **P.S.**(ठाणे): संत तुकारामनगर
FIR No.(प्रथम खबर क्र.): 0579 **Year** (वर्ष): 2026
Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):29/10/2026 14:48

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८	7

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):
1. **Day**(दिवस): गुरूवार
Time Period (कालावधी):
Date From (दिनांक पासून): 11/06/2026
Date To (दिनांक पर्यंत): 11/06/2026
Time From (वेळेपासून): 14:55 बजे
Time To (वेळेपर्यंत): 18:52 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
Date (दिनांक): 29/10/2026 **Time** (वेळ): 14:24 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ):
Entry No. (नोंद क्र.): 019
Date & Time (दिनांक आणि वेळ): 29/10/2026 14:24 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी
5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):
1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
पश्चिम, 3 किमी **Beat No.** (बिट क्र.):
(b) **Address** (पत्ता): लोकसेवक श्री प्रमोद ओंबासे यां,पाणीपुरवठा विभाग,पिंपरी,चिंचवड महानगरपालिका

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):

Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): निता चत्रभुज मिसाळ

(b) **Guardian's Name** (पालक चे नाव) : चत्रभुज मिसाळ

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1990

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड)

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) **Address** (पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	सहा पोलीस आयुक्त, लाप्रवि ,संत तुकारामनगर,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र, भारत
2	स्थायी पता	सहा पोलीस आयुक्त, लाप्रवि ,संत तुकारामनगर,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र, भारत

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9822214414

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	श्री प्रमोद ओंबासे			1. मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभा,पिंपरी चिंचवड महानगरपालिका,संत तुकारामनगर,पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र,भारत

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

Scanned with CamScanner

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.Inquest Report / U.D. case No., if any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)

.12.First Information contents (प्रथम खबर हकीकत):
फिर्याद जबाब गु.रजि. क्रमांक व कलम- 579/2026 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम – 7 प्रमाणे.

तारीख - 29/10/2026
मी निता चत्रभुज मिसाळ, वय-47 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस उप-अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मो नं 9822214414.

मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे दिनांक 24/08/2024 रोजीपासून पोलीस उप-अधिक्षक या पदावर कार्यरत आहे. दिनांक 11/06/2026 रोजी ला.प्र.वि. कार्यालयात हजर असताना श्री दयानंद गावडे, पोलीस उपअधीक्षक, (प्रशासन), लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी आम्हास तक्रारदार श्री. सुर्यकांत शिवराम भराटे, वय 37 वर्षे, व्यवसाय ठेकेदार, रा. प्लॉट नं. 70, गणेश टॉवर समोर, संतनगर, मोशी प्राधीकरण, पुणे 412105 यांची ओळख करून दिली व त्यांची लोकसेवकाविरूद्ध लाचेविषयीची असलेली तक्रार नोंद करून त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेशीत केले. त्यानंतर पंचांना बोलावुन घेवुन त्यांची तक्रारदार व सापळा पथकासोबत ओळख करुन दिली. त्यानंतर दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार श्री. सुर्यकांत शिवराम भराटे यांनी त्यांची लेखी तक्रार दिली ती खालीलप्रमाणे-

"मी वरीलप्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर मी माझे कुटंबासह राहणेस आहे. माझी श्री गणेश एंटरप्रायझेस या नावाची प्रोप्रायटरी कंपनी आहे. माझा भाचा श्री. निशीकांत धनाजी बारवकर याचे नावाने राजेंद्र इंजिनियर्स या नावाची कंपनी आहे तसेच माझा भाऊ श्री. चंद्रकांत शिवराम भराटे यांचे नावाने भराटे कन्स्ट्रक्शन ही कंपनी आहे त्यापैकी राजेंद्र इंजिनयर्स व भराटे कन्स्ट्रक्शन कंपनीतर्फे टेंडर भरून टेंडर संदर्भातील पत्रव्यवहार करण्याचे तसेच टेंडरची मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्षात कामकाज करण्याचे अधिकारपत्र मला दिलेले आहे. वरील तिनही कंपन्यांचे माध्यमातून मी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अखत्यारीतील पाणीपुरवठा विभागाचे देखभाल दुरूस्ती व नवीन पाईपलाईन टाकण्याचे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कंत्राट घेत असतो.

माझ्या श्री गणेश एंटरप्रायझेस या कंपनीचे नावाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका अखत्यारीतील पाणीपुरवठा विभागाचे देखभाल दुरूस्ती व नवीन पाईपलाईन टाकण्याचे 1) टेंडर नं. 8/10 /2025-26, रक्कम रु. 15,11,844/-, 2) टेंडर नं. 9/33/2025-26, रक्कम रु. 15,64,011/-, तसेच भराटे कन्स्ट्रक्शन या कंपनीचे नावाने 1) टेंडर नं. 9/34/2025-26, रक्कम रू. 21,95,218/- आणि राजेंद्र इंजिनयर्स या कंपनीचे नावाने 1) टेंडर नं. 8/5/2025-26 रक्कम रू. 23,72,898/-, 2) टेंडर नं. 8/7/2025-26 रक्कम रू. 15,13,097/- अशी एकुण रक्कम रू. 91,57,068/- रक्कमेची पाच कंत्राटे आम्ही घेतलेली आहेत. आम्हाला पाचही कंत्राटाचे वर्क ऑर्डर प्राप्त करण्याकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेशी करारनामा करावा लागणार आहे. त्याकरीताचा करारनामा तयार करून त्यावर आमचे कंपन्यांच्या वतीने सर्वांच्या सहया करून पाणी पुरवठा विभागाचे अधीक्षक अभियंता व मुख्य अभियंता यांच्या सहयांकरीता प्रकरण आम्ही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे जमा केली आहेत. तेथील टेंडर क्लर्क दौनकर मॅडम व टेंडर क्लर्क शेख यांनी आमची प्रकरणे पाणी पुरवठा विभागाचे अधीक्षक अभियंता श्री.अजय सुर्यवंशी यांचकडे पाठवली. म्हणुन मी पाणी पुरवठा विभागाचे अधीक्षक अभियंता श्री. अजय सुर्यवंशी यांची भेट घेतली असता त्यांनी मला तुम्हाला फॉर्मलिटी करावी लागेल असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना म्हणजे नक्की काय करावे लागेल असे विचारले असता त्यांनी टेंडर रक्कमेच्या 0.5 टक्क्यांप्रमाणे पैसे दयावे

Scanned with CamScanner

लागतील असे म्हणून माझ्याकडे 45,785/- रक्कमेची लाचेची मागणी केली तेव्हा मी त्यांना माझे काम अगोदर होऊ दया, नंतर बघु असे म्हणालो होतो. त्यानंतर त्यांनी माझ्या पाच टेंडर पैकी तीन टेंडरवर सही करून मुख्य अभियंता श्री. प्रमोद ओंबासे यांच्या सहीकरीता पाठवून दिली आहेत ती तीन प्रकरणे मुख्य अभियंता श्री. प्रमोद ओंबासे यांच्याकडे सहयांसाठी प्रलंबित आहेत. तसेच उर्वरीत दोन प्रकरणे अधीक्षक अभियंता श्री.अजय सुर्यवंशी यांच्याकडे सहयांसाठी प्रलंबित आहेत. माझी प्रकरणे दोघांनीही ब-याच दिवसांपासून प्रलंबित ठेवली असल्याने मी आमच्या ऑफीसमधील श्री. रविंद्र गौड यांना याबाबत पाठपुरावा करण्यासाठी वेळोवेळी पिंपरी चिंचवड म.न.पा. ममध्ये पाठवित होतो. दिनांक 29/05/2026 रोजी मी स्वत: पाणी पुरवठा विभागाचे मुख्य अभियंता श्री. प्रमोद ओंबासे यांची माझ्या प्रलंबित कामासंदर्भात भेट घेतली व माझी पाच टेंडरच्या करारनाम्यावर सही करण्याची विनंती केली तेव्हा त्यांनी सर्व पाचही टेंडरवर सहया करण्यासाठी टेंडर रक्कमेच्या 0.5 टक्क्यांप्रमाणे पैसे दयावे लागतील असे म्हणून माझ्याकडे 45,785/- रक्कमेची लाचेची मागणी केली. परंतु यापुर्वी करारनाम्यावर सही करण्यासाठी कोणीही लाचेची रक्कम मागणी केली नसल्याने मी ते लाच रक्कम न घेता सही करतील असा विचार करून वाट पाहीली परंतु त्यांनी आजपर्यंत माझ्या करारनाम्यावर सही केलेली नाही.तसेच दि. 09/06/2026 रोजी पाणी पुरवठा विभागाचे अधीक्षक अभियंता श्री.अजय सुर्यवंशी यांच्या कार्यालयातील शिपाई यांनी मोबाईल नंबर 9850297741 यावरून माझ्या मोबाईलवर फोन करून टेंडरच्या करारनाम्यावर सही करण्याचे कामासंदर्भात बोलाविले असल्याचा निरोप दिला आहे. त्यामुळे माझी खात्री झाली आहे की, पाणी पुरवठा विभागाचे अधीक्षक अभियंता श्री.अजय सुर्यवंशी आणि मुख्य अभियंता श्री. प्रमोद ओंबासे यांना त्यांनी मागणी केलेली टेंडर रक्कम रू. 91,57,068/- चे प्रत्येकी 0.50 टक्के प्रमाणे प्रत्येकी रू. 45,785/- लाचेची रक्कम दिल्याशिवाय ते माझे करारनाम्यावर सही करण्याचे शासकीय कामकाज करणार नाहीत अशी माझी खात्री झाली आहे म्हणून माझी त्यांचेविरूध्द तक्रार आहे. माझ्याकडे मागणी करीत असलेल्या लाचेची रक्कम ही कोणतीही शासकीय फी नसून लाच रक्कम आहे ती देण्याची माझी इच्छा नाही. अधीक्षक अभियंता श्री.अजय सुर्यवंशी व मुख्य अभियंता श्री. प्रमोद ओंबासे यांचेशी माझे कोणतेही आर्थिक व्यवहार नाहीत, तसेच त्यांचेशी माझे कोणतेही वैर नाही. तरी आपले विभागामार्फत त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई व्हावी हि विनंती" वगैरे मजकुराची तक्रार तक्रारदार यांनी स्वहस्ताक्षरात लिहुन दिली. तक्रारदार यांनी सदर तक्रारीवर स्वाक्षरी केली आहे. त्यानंतर त्यावर मी व पंचांनी दिनांकीत स्वाक्षरी केलेली आहे.

त्यानंतर दिनांक 11/06/2026 रोजी तक्रारदार श्री. सुर्यकांत शिवराम भराटे यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लोकसेवक अधीक्षक अभियंता श्री.अजय सुर्यवंशी व मुख्य अभियंता श्री. प्रमोद ओंबासे हे तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत पडताळणी कारवाई करण्याचे ठरले. त्यावेळी आमचेकडील सोनी कंपनिचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व नवीन ई.व्ही.एम. कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे सिलंबद पॅकिंगमधील मेमरीकार्ड काढले त्याची पंचाचे समक्ष पाहणी केली असता त्याचे एका बाजुस E VM Elite 32 GB Micro SD 10 1 HC I Vio व त्याचे दुस-या बाजुस MHH 07CC0AYM-BG CMA03A01TMBC14BAT EETF32GBC0925 असे छापलेले होते. सदरचे मेमरीकार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घालून त्यामध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याची खात्री पंचांना करून दिली. त्यानंतर पडताळणी कारवाईवेळी नोंद करण्यात येणारे निवेदन हे व्हिडीओ चित्रीकरण करून करण्यात येणार असल्याचे कळवुन त्यानंतर माझेकडील साहित्यामधून नवीन ई.व्ही.एम. कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे सिलंबद पॅकिंगमधील मेमरीकार्ड काढले त्याची पंचाचे समक्ष पाहणी केली असता त्याचे एका बाजुस E VM Elite 32 GB Micro SD 10 1 HC I Vio व त्याचे दुस-या बाजुस MHH07CC0AYM-BG CMA03AO1TMBC14BAT EETF32GBC0925असे छापलेले होते. ते सोनी कंपनीचे शासकीय व्हिडीओ रेकॉर्डींग कॅमेरामध्ये टाकून चित्रीकरण थेटपणे मेमरीकार्ड मध्ये करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर मी तक्रारदार श्री भराटे व दोन्ही पंचांचे पडताळणी कारवाईचे अनुशंगाने निवेदने ध्वनिमुद्रीत केली ती वेळ 14.31 ते 14.38 वा.ची होती. निवेदन रेकॉर्ड झाल्यानंतर व्हाईस रेकॉर्डर व व्हिडीओ रेकॉर्डर बंद केला.

त्यानंतर तक्रारदार श्री. भराटे, पंच व सापळा पथकास योग्य त्या सुचना देऊन तक्रारदारांना लोकसेवक अधीक्षक अभियंता श्री.अजय सुर्यवंशी व मुख्य अभियंता श्री. प्रमोद ओंबासे यांची पिंपरी ंिचंचवड महानगरपालिका इमारतीतील पहिल्या मजल्यावर पाणीपुरवठा विभागाची कार्यालयात जाऊन भेट घेणेकामी रवाना करण्याचे व त्याकरीता पुढील कार्यवाही एम्पायर ईस्टेट समोरील पुलाखाली, चिंचवड येथून करण्याचे ठरले. त्यानुसार पंच क्र. 1, पो.हवा.जाधव व तक्रारदार हे तक्रारदार यांच्याकडील हुंडाई वेरना कार नं. एम एच 14 एल.जे. 8231 मधुन तसेच मी व पंच क्र. 2 असे सापळा कारवाईसाठी आवश्यक साहित्यासह चा.पो.कॉ.चंद्रकांत कदम यांचेसह शासकिय वाहन एरटीगा नं. एम.एच. 12 यु.सी. 4105 हीमध्ये बसुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग या ठिकाणाहुन

Scanned with CamScanner

14.55 वा. रवाना होऊन साधु वासवानी चौक-जहांगिर हॉस्पिटल-आरटीओ कार्यालय मार्गे –जुना मंुबई-पुणे हायवे ने चिंचवड येथील येथील एम्पायर ईस्टेट समोरील पुलाखाली 15.30 वा. सुमारास पोहचलो. तक्रारदार हे सुध्दा त्यांचेकडील हुंडाई कारमधून पोहोचले. त्यानंतर मी, पंच क्र.1, पो.हवा.जाधव असे तक्रारदार यांचे वाहनात बसून त्यांना दिलेल्या सुचनांची थोडक्यात उजळणी केली. शासकीय व्हाईस रेकॉर्डर चालु करून होल्ड मोडवर ठेवून पो.हवा.जाधव यांचे मार्फतीने तक्रारदार यांचे शर्टचे आतील बाजूस असणारे बनियनला लावला ती वेळ 15.45 वाजताची होती. तक्रारदार व पंच क्र. 1 श्री. जाधव यांना तक्रारदार यांचे हुंडाई वेरना कार नं. एम एच 14 एल.जे. 8231 मधुन लोकसेवक यांची भेट घेण्याकरीता रवाना केले. त्यानंतर सापळा पथक व पंच क्र. 1 हे शासकीय वाहनासह एम्पायर इस्टेट या इमारतीचे समोरील बाजूस असणारे पार्कींगमध्ये थांबून राहीलो.
त्यानंतर तक्रारदार व पंच नं.01 असे सापळा पथक व पंच क्र. 2 थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी पो.हवा. जाधव यांनी तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून तो बंद केला ती वेळ 18.52 वा.ची होती. त्यानंतर पंच क्र. 1 यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की, ते व तक्रारदार असे तक्रारदार यांचे कारमधुन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे गेटवर पोहचले. तेथुन ते पीसीएमसीचे मुख्य ईमारतीमधील पहिल्या मजल्यावरील पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता यांचे केबीनचे बाहेर जावुन थांबले. तेथे एका पांढ-या गणवेषा सारखे पांढरे कपडे घातलेली व्यक्ती तक्रारदार यांना भेटली. तेथे गर्दी असल्याने पंच क्र. 1 व तक्रारदार तेथुन अधिक्षक अभियंता श्री अजय सुर्यवंशी यांचे केबीनजवळ गेले. तेथेही गर्दी असल्याने ते पुन्हा ओंबासे यांचे केबीनकडे गेले. त्यावेळी पांढ-या वेषातील व्यक्ती ही त्यांचे सोबत होती त्याचे नाव रविंद्र गौड असल्याचे व तक्रारदार यांचा सुपरवायझर असल्याचे तक्रारदार यांनी नंतर सांगितलेले आहे. तेथे ते थांबुन राहिले. काही वेळाने तक्रारदार यांचेसोबत असलेला इसम हा पंच क्र. 1 व तक्रारदार यांना घेवुन मुख्य अभियंता यांचे केबीनमध्ये गेला. तेथे गेल्यावर तक्रारदार हे खुर्चीवर बसलेल्या लोकसेवक मुख्य अभियंता श्री. ओंबासे यांना "ते.. तिन अॅग्रीमेंट होत"ं असे म्हणाले तेव्हा लोकसेवक श्री. ओंबासे यांनी "हं. कधी.. कधी येणार" असे विचारले तेव्हा तक्रारदारांनी त्यांना "त्यादिवशी भेटुन गेले.. ते म्हणले" असे म्हणाले तेव्हा लोकसेवक श्री. ओंबासे यांनी तक्रारदारांना "कुठ.. दे.." असे विचारले व त्यांचे खुर्चीचे मागील टेबलकडे हात दाखविला तोपर्यंत तक्रारदार यांचेसोबत आलेला रविंद्र गौड याने लोकसेवकाचे खुर्चीचे मागील टेबलवरील फाईल काढून लोकसेवक यांचे समोर टेबलवर ठेवल्या. त्यानंतर तक्रारदाराने लोकसेवकांना विचारले की, "नाही.. "नाही.. ते म्हणल किती दयायचे काय.. डिस्काऊंट.." त्यावेळी लोकसेवक तक्रारदारांना म्हणाले की, "काय दीऊन टाक.. पन्नास पन्नास लाख दयायचे एकाएकाचे.. घे.. चल.. एवढ..काय अस.. काय म्हणत्यात त्याला.. किती घेतलीत काम.. सगळी.." असे फाईल चेक करीत म्हणाले. त्यानंतर तक्रारदारांनी त्यांना टोटल पाच काम हेत साहेब त्यानंतर लोकसेवकांनी तक्रारदारांना सगळी टोटल सांग.. किती टक्के बीलो.. ये..पंचवीस. असे विचारले तेव्हा तक्रारदारांनी त्यांना तिस टक्के साहेब.. असे सांगितले तेव्हा लोकसेवकाने तक्रारदारांना हा.. तिस धर.. हा चल.. असे म्हणाले तोपर्यंत तक्रारदारांनी लोकसेवक यांना "हे.. नव्वद लाखाची काम होत्यात टोटल.. अजुन सुर्यवंशी साहेबांकड दोन फाईली हेत.." असे सांगितले. तेव्हा लोकसेवक तक्रारदारांना "पण हे कितीयेत.." असे विचारले तेव्हा तक्रारदारांनी त्यांना हे "तिनयत.." असे सांगितले त्यानंतर लोकसेवक तक्रारदारांना "तिनचच.. सांगतोय मी तुला.." असे म्हणाले. तोपर्यंत रविंद्र गौड यांनी त्यांचेसोबत आणलेला कागद लोकसेवक यांचेसमोर दिला व "हे अडोतीस हेत.." असे म्हणाले तेव्हा तक्रारदारही लोकसेवकांना हा अडतीस असे म्हणाले त्यानंतर लोकसेवकांनी फाईल पाहत "पंधरा..पंधरा तीस ..आणि.. अडतीस.. अणि बीलो करुन किती होत्यात त्याची.." असे विचारले तेव्हा तक्रारदारांनी त्यांना "तेच अडतीस होत्यात ना.." असे म्हणाले. त्यानंतर रविंद्र गौड "हा. अडोतीस टोटल होतात साहेब.. एक टक्क्यानी- अध्र्या टक्क्यानी एकोनिस होतात.." असे लोकसेवक यांना म्हणाले. तोपर्यंत लोकसेवक यांनी त्यांच्यासमोरील फाईलवर सहया केल्या त्यानंतर तक्रारदार लोकसेवक यांना "सर, पण आता नायत.. उदया.. आता नायत पैसे.." असे म्हणाले तेव्हा लोकसेवक "हैका" असे म्हणुन हाताने काय हे असे हावभाव करतात त्यावर पुन्हा तक्रारदार हे "उदया देतो साहेब.." असे म्हणाले असता लोकसेवक ओंबासे हे "अं.." असे म्हणाले. तेव्हा रविंद्र गौड हे लोकसेवक ओंबासे यांना "मी म्हणलो साहेबांना भेटा" असे म्हणाले असता लोकसेवक ओंबासे हे रविंद्र गौड यांचेकडे पाहात "तुझी जबाबदारी.." असे म्हणाले त्यावर श्री. गौड हे लोकसेवकांना ठीके असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार परत एकदा उदया देतो मी.. असे म्हणाले त्यानंतर लोकसेवक तक्रारदार यांचेत यापुर्वी दिलेल्या रक्कमेमध्ये 500/- रूपये कमी दिलेले होते अशी बोलणी झाली. त्यानंतर श्री. ओंबासे यांना तक्रारदारांनी यापुर्वी घेतलेल्या एका 6 लाख रक्कमेच्या टेंडरच्या बीलावेळी 6,000/- रक्कम दिली होती त्याबाबत ओंबासे हे तक्रारदारांना म्हणाले की, "साडे सहा..तुला आणले का.. तु हो म्हणला अन टाकले त्याच्यात.. तसेच मी एकाला दिलते. झाली ना बोंब. तो म्हणला साहेब पाचशे कमी येत त्यात.. मिक्सर घेतला.. मला खाली बघाव लागल ना त्यात..मला खाली बघाव लागल की

Scanned with CamScanner

नाय.. तु पाचशे.. साडेपाच जरी दिले असते. साहेब..तरी मला चालतय.. तुझ्या भरोशावर मी तशाच तस दिल... तो कोणय ते मला कळल नाही..त्याज्यामुळ कागदावर मी लिहतो.. एकानं पंचवीस के लिहलय बर का त्याज्याव.. म्हणजे पंचवीस हजार.. साडेसातच निघाले त्याच्यात.. चुकीच ये ना.. सांग बर.."असे म्हणाले. त्यानंतर अवांतर बोलणी झाल्यानंतर तक्रारदारांनी लोकसेवक यांना "अजुन दोन फाईल हेत..ना.." असे सांगितले तेव्हा लोकसेवकांनी तक्रारदारांना आता हया चार झाल्या का.. असे विचारले तेव्हा तक्रारदारांनी त्यांना "तिन झाल्या.. तिनच येत.." असे सांगितले. त्यानंतर लोकसेवकांनी पंच क्र.1 यांचेकडे पाहात "हा..मग.एक.. तुमच काय होत.." असे विचारले तेव्हा लोकसेवकांनी तक्रारदारांना "त्या हयाज्यात राजेंद्रच्या दोन फाईली.. त्याच्यामुळ" असे सांगितले. तेव्हा तक्रारदारांनी त्या पाच मध्येयत का असे विचारले त्यावर तक्रारदारांनी "हा पाच मध्येत" असे सांगितले. ते संपुर्ण संभाषण पंच क्र. 1 यांचेसमक्ष झाले असुन ते त्यांनी ऐकलेले व पाहीलेले आहे. त्यानंतर आम्ही दोघेही लोकसेवक श्री. ओंबासे यांचे केबीनमधून बाहेर आले. त्यानंतर रविंद्र गौड यांनी सहया झालेल्या फाईल पाणीपुरवठा विभागातील एका महिला कर्मचा-याकडे दिल्या. नंतर तक्रारदारांनी पंच क्र. 1 यांना मानेने खुनावून त्यांचेसोबत येण्यास सांगितले. त्याप्रमाणे पंच क्र. 1 त्यांचेसोबत गेले. तेव्हा श्री. सुर्यवंशी यांचे कार्यालयात मिटींग सुरू होती व बाहेर भेटण्यासाठी बरेच लोक थांबलेले होते. त्यानंतर पंच क्र. 1 व तक्रारदार हे श्री. सुर्यवंशी यांचे केबीने बाहेर थांबून राहीले. त्याचदरम्यान श्री. सुर्यवंशी हे केबीनमधून बाहेर निघून गेले. ते कोठेतरी मिटींगकामी गेले असल्याचे त्यांचे शिपायाने सांगितले. त्यानंतर पंच क्र. 1 व तक्रारदार हे श्री. सुर्यवंशी यांचे केबीनचे बाहेर त्यांची वाट पाहत थांबून राहीले. नंतर कार्यालयीन वेळेनंतर साधारणपणे पावनेसात वाजण्याचे सुमारास श्री. सुर्यवंशी हे परत येणार नाहीत असे समजुन पंच क्र. 1 व तक्रारदार हे परत त्यांचे हुंडाई वेरना कार मध्ये बसून एम्पायर इस्टेट समोरील पार्कींगमध्ये आले. त्यानंतर तक्रारदार यांना घडलेल्या घटनेबाबत विचारणा करता त्यांनी पंच क्र. 1 यांचेप्रमाणे हकिकत सांगुन श्री ओंबासे यांनी त्यांचेसमोर असलेल्या तक्रारदार यांच्या 3 फाईलच्या टेंडर रक्कमेच्या बीलो 30 करुन होणा-या 38 लाख टेंडर रक्कमेच्या 0.5 टक्के प्रमाणे 19 असे बोलुन 19 हजार रुपये लाचेची मागणी केल्याचे सांगितले. पंच क्र. 1, 2 व तक्रारदार यांचे समक्ष व्हॉईस रेकॉर्डवरील संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता तक्रारदार व पंच 1 श्री. किर्तीराज मुगुटराव जाधव यांनी सांगीतलेप्रमाणेच संभाषण मिळुन आले. यावरुन लोकसेवक यांनी 38 लाख टेंडर रक्कमेच्या 0.50 टक्के 19 हजार रक्कम आणुन देण्याची रविंद्र गौड यांचेकडुन खात्री करुन घेतली. तसेच पडताळणी दरम्यान लोकसेवक तक्रारदार यांना तक्रारदार यांनी यापुर्वी दिलेल्या रक्कमेमध्ये 500/- रूपये कमी दिलेले होते अशी बोलणी करतात. लोकसेवक ओंबासे तक्रारदार यांना, "साडे सहा..तुला आणले का.. तु हो म्हणला अन टाकले त्याच्यात.. तसेच मी एकाला दिलते. झाली ना बोंब. तो म्हणला साहेब पाचशे कमी येत त्यात.. मिक्सर घेतला.. मला खाली बघाव लागल ना त्यात..मला खाली बघाव लागल की नाय.. तु पाचशे.. साडेपाच जरी दिले असते. साहेब..तरी मला चालतय.. तुझ्या भरोशावर मी तशाच तस दिल... तो कोणय ते मला कळल नाही..त्याज्यामुळ कागदावर मी लिहतो.. एकानं पंचवीस के लिहलय बर का त्याज्याव.. म्हणजे पंचवीस हजार.. साडेसातच निघाले त्याच्यात.. चुकीच ये ना.. सांग बर.." असे म्हणाले. यावरुन लोकसेवक यांनी यापुर्वीही तक्रारदार यांचेकडुन पैसे स्विकारल्याचे दिसुन येते.. यावरुन लोकसेवक यांनी यापुर्वी तक्रारदार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारल्याचे दिसुन येत आहे. दि. 11/06/2026 रोजी झालेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. अजय सुर्यवंशी, अधीक्षक अभियंता यांचेशी तक्रारदार यांची भेट झालेली नाही आणि कार्यालयीन वेळ संपली असल्याने दि. 11/06/2026 रोजीची पडताळणी कारवाई स्थगीत करून दि. 12/06/2026 रोजी तक्रारदार श्री. भराटे यांना पुन्हा एकदा लोकसेवक श्री. अजय सुर्यवंशी यांची भेट घेण्याकरीता व पुर्वीचे लाच रक्कमेबाबत पुन्हा एकदा स्पष्टपणे बोलणी करण्याकरीता पाठविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार, पंच व सापळा पथक यांना कारवाई बाबत गोपनियता राखणेबाबत तसेच दिनांक 12/06/2026 रोजी सकाळी 11.00 वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयात उपस्थित राहण्याच्या सुचना दिल्या.

दि. 11/06/2026 रोजीच्या कारवाई दरम्यान संभाषण ध्वनिमुद्रित करण्यासाठी वापरलेले मेमरी कार्ड तसेच व्हिडीओ चित्रीकरणासाठी वापरलेले मेमरीकार्ड हे पुढील कारवाईवेळी वापरण्याचे ठरविण्यात आले त्यामुळे दोन्ही मेमरी कार्ड सिल करून राखून ठेवण्यात आले. सदर संपुर्ण कारवाईचा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

दि. 12/06/2026 रोजी दिलेल्या सुचनेनुसार पंच क्र. 1, 2, पो.हवा.जाधव, ब.नं. 1952 हे हजर राहीले होते. तसेच सापळा पथकामध्ये ला.प्र.वि, पुणे कडील पो.कॉ./9843/ कैलास महामुलकर यांना नव्याने सामील केले. त्यानंतर तक्रारदार श्री. सुर्यकांत शिवराम भराटे हे कार्यालयात आले. त्यानंतर तक्रारदार श्री. भराटे यांचेकडे अधीक्षक अभियंता श्री.अजय सुर्यवंशी व मुख्य अभियंता श्री. प्रमोद ओंबासे हे लाच मागणी करतात अगर कसे?

Scanned with CamScanner

याबाबतची पडताळणी करण्याकरिता तक्रारदार व पंच यांचे निवेदन घेवुन 13,45 वा.रवाना केले. दि. 12/06/2026 रोजी झालेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार श्री. भराटे यांनी पंच क्र. 1 श्री. जाधव यांचेसह पिंपरी ंिचंचवड महानगरपालिका इमारतीतील पहिल्या मजल्यावर पाणीपुरवठा विभागात जाऊन लोकसेवक श्री. अजय सुर्यवंशी, अधीक्षक अभियंता, पाणी पुरवठा विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांची भेट घेतली असता, लोकसेवक अधीक्षक अभियंता श्री. अजय सुर्यवंशी यांनी तक्रारदार यांच्या प्रलंबित असलेल्या दोन फाईलवर त्यापुर्वीच स्वाक्षरी करून ठेवली होती त्यानंतर तक्रादार लोकसेवक श्री. सुर्यवंशी याचे केबीनमध्ये पंच क्र. 1 यांचेसह गेले असता त्यांनी तक्रारदारांकडे लाचेसंदर्भात बोलणी केली नाही. तक्रारदार यांनी त्या फाईलस् घेऊन लोकसेवक मुख्य अभियंता श्री. ओंबासे यांचे कार्यालयात जाऊन तेथे ठेवल्या आहेत. लोकसेवक श्री. प्रमोद ओंबासे, मुख्य अभियंता, पाणी पुरवठा विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हे कार्यालयात नसल्याने त्यांचेशी तक्रारदार यांची भेट झालेली नाही. त्यामुळे दि. 12/06/2026 रोजीची पडताळणी कारवाई स्थगीत करण्यात आली. परंतु लोकसेवक श्री. प्रमोद ओंबासे यांचे टेबलवर ठेवलेल्या इतर दोन फाईलच्या अनुशंगाने लोकसेवक ओंबासे हे आणखी लाच रक्कमेची मागणी करण्याची शक्यता असल्याने पुन्हा एकदा लोकसेवक श्री. प्रमोद ओंबासे यांचेशी उर्वरीत दोन फाईलविषयी तसेच पुर्वीच्या लाच रक्कमेबाबत स्पष्टपणे बोलणी करण्याकरीता पाठवून पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर मी तक्रारदार, पंच व सापळा पथक यांना कारवाई बाबत गोपनियता राखणेबाबत तसेच दिनांक 15/06/2026 रोजी सकाळी 11.00 वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयात उपस्थित राहण्याच्या सुचना दिल्या.तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

दि. 15/06/2026 रोजी पडताळणी कारवाई केली असता पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार श्री. भराटे यांना पंच क्र. 1 श्री. जाधव यांचेसह पिंपरी ंिचंचवड महानगरपालिका इमारतीतील पहिल्या मजल्यावर पाणीपुरवठा विभागात जाऊन लोकसेवक श्री. प्रमोद ओंबासे, मुख्य अभियंता, पाणी पुरवठा विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे कार्यालयात पडताळणीकामी पाठविले असता ते कार्यालयात नसल्याने त्यांचेशी तक्रारदार यांची भेट झालेली नाही. तसेच तक्रारदार यांच्या उर्वरीत दोन फाईल्स्वरसुध्दा लोकसेवक श्री. प्रमोद ओंबासे यांची स्वाक्षरी झाल्याचे पंच क्र.1 व तक्रारदार यांनी सांगितले. दि. 15/06/2026 रोजीची पडताळणी कारवाई स्थगीत करून तक्रारदार यांना लोकसेवक यांचेकडून त्यांचे शासकीय कामासंदर्भात भेटण्याचा निरोप आल्यानंतर पुढील पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर मी तक्रारदार, पंच व सापळा पथक यांना कारवाई बाबत गोपनियता राखणेबाबत तसेच तक्रारदार यांना लोकसेवक यांचेकडून बोलावल्याचा निरोप आल्यानंतर उपस्थित राहण्याच्या सुचना दिल्या. कारवाईदरम्यान वापरलेले दोन्ही मेमरीकार्ड पंचासमक्ष सिल केले. याबाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर दिनांक 30/09/2026 रोजी तक्रारदार हे लाप्रवि कार्यालयात हजर आले त्यावेळी त्यांनी सांगितले की, दिनांक 09/09/2026 रोजीपासुन ओंबासे यांचेकडुन पाणीपुरवठा विभागाचा चार्ज काढुन घेतला आहे. तसेच ओंबासे यांनी तक्रारीमध्ये नमुद असलेल्या पाचही फाईलवर पडताळणी दरम्यान सहा केलेल्या आहेत. सध्या तक्रारीमध्ये नमुद प्रमाणे फाईल प्रलंबित नाही. ओंबासे यांचेकडुन पाणीपुरवठा विभागाचा चार्ज काढुन घेतल्याने ते भविष्यात करारनाम्यावर केलेल्या सहांचे मोबदल्यात लाच मागणी केलेली रक्कम स्विकारतील असे वाटत नाही. त्यामुळे लाच मागणीच्या तक्रारीचे अनुशंगाने चालु असलेली पडताळणी कारवाई स्थगित करण्यात यावी तसेच मुख्य अभियंता श्री प्रमोद ओंबासे यांनी दिनांक 11/06/2026 रोजी तक्रारदार यांचेकडे केलेल्या लाच मागणीचे अनुशंगाने त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी.

तरी दिनांक 11/06/2026 रोजी 14.55 ते 18.52 दरम्यान पाणीपुरवठा विभाग,पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथील लोकसेवक श्री प्रमोद ओंबासे यांचे केबीनमध्ये करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदाराने लोकसेवक यांना विचारले की, "नाही.. ते म्हणल किती दयायचे काय.. डिस्काऊंट.." त्यावेळी लोकसेवक तक्रारदारांना म्हणाले की, "काय दीऊन टाक.. पन्नास पन्नास लाख दयायचे एकाएकाचे.. घे.. चल.. एवढ..काय अस.. काय म्हणत्यात त्याला.. किती घेतलीत काम.. सगळी.." असे फाईल चेक करीत म्हणाले. मुख्य अभियंता श्री प्रमोद ओंबासे यांचेशी तक्रारदार यांनी पंचासमक्ष तसेच रविंद्र गोड यांचे समक्ष कामासंदर्भाने चर्चा केली असता मुख्य अभियंता प्रमोद ओंबासे यांना रविंद्र गोड हे पंच क्र. 1 यांचे समक्ष तक्रारदार यांच्या पाच टेंडरच्या फाईलपैकी त्यांचे टेबलवर असलेल्या तीन टेंडरच्या प्रकरणाचे करारनाम्यावर सही करण्याकरीता 30 टक्के बिलोने तीन फाईलच्या कामाच्या एकुण 38 लाख टेंडर रक्कमेच्या 0.50 टक्के 19 हजार होतात असे बोलले असता लोकसेवक ओंबासे यांनी सदर रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शविली. त्यानंतर लोकसेवक यांनी त्यांच्यासमोरील फाईलवर सहया केल्या त्यानंतर तक्रारदार लोकसेवक यांना "सर पण आता नायत.. उदया.. आता नहायत पैसे.." असे म्हणाले तेव्हा लोकसेवक "हैका" असे म्हणुन हाताने काय हे असे हावभाव करतात त्यावर पुन्हा तक्रारदार हे

Scanned with CamScanner

"उदया देतो साहेब.." असे म्हणाले असता लोकसेवक ओंबासे हे "हं." असे म्हणाले. तेव्हा रविंद्र गौड हे लोकसेवक ओंबासे यांना "मी म्हणलो साहेबांना भेटा" असे म्हणाले असता लोकसेवक ओंबासे हे रविंद्र गौड यांचेकडे पाहात "तुझी जबाबदारी.." असे म्हणाले. त्यावर रविंद्र गौड हे त्यांना ठीके असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार परत एकदा उदया देतो मी.. असे म्हणाले यावरुन लोकसेवक यांनी 38 लाख टेंडर रक्कमेच्या 0.50 टक्के 19 हजार रक्कम आणुन देण्याची रविंद्र गौड यांचेकडुन खात्री करुन घेतली. तसेच पडताळणी दरम्यान लोकसेवक तक्रारदार यांना तक्रारदार यांनी यापुर्वी त्यांच्या 6 लाख रुपये बिलाच्या पोटी लोकसेवक यांनी स्विकारलेल्या 6000/- रक्कमे मध्ये 500/- रूपये कमी दिलेले होते अशी बोलणी करतात. लोकसेवक ओंबासे तक्रारदार यांना, "साडे सहा..तुला आणले का.. तु हो म्हणला अन टाकले त्याच्यात.. तसेच मी एकाला दिलते. झाली ना बोंब. तो म्हणला साहेब पाचशे कमी येत त्यात.. मिक्सर घेतला.. मला खाली बघाव लागल ना त्यात..मला खाली बघाव लागल की नाय.. तु पाचशे.. साडेपाच जरी दिले असते. साहेब..तरी मला चालतय.. तुझ्या भरोशावर मी तशाच तस दिल... तो कोणय ते मला कळल नाही..त्याज्यामुळ कागदावर मी लिहतो.. एकानं पंचवीस के लिहलय बर का त्याज्याव.. म्हणजे पंचवीस हजार.. साडेसातच निघाले त्याच्यात.. चुकीच ये ना.. सांग बर.." असे म्हणाले. यावरुन लोकसेवक यांनी यापुर्वीही तक्रारदार यांचेकडुन पैसे स्विकारल्याचे कबुल केले. तसेच लोकसेवकांनी सांगितले की यापुर्वी दुस-या एका व्यक्तीने पंचवीस के म्हणजेच 25,000/- रक्कम लिहली परंतु त्यात त्यामध्ये 7,500/- रक्कम टाकली होती. यावरुन लोकसेवक हे लाच रक्कम स्विकारण्याच्या सवयीचे असल्याचे दिसुन येते. अशा प्रकारे लोकसेवक श्री प्रमोद ओंबासे मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी तक्रारदार यांचे पाणीपुरवठा विभागाचे 3 टेंडर कामाच्या एकुण 38 लाख टेंडर रक्कमेच्या 0.50 प्रमाणे 19 हजार रुपये लाच मागणी करुन ती स्विकारण्याची तयारी दर्शविली तसेच पुर्वी लाच रक्कम स्विकारल्याचे मान्य केले म्हणुन माझी सरकारतर्फ त्यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

दाखल अधिकारी- श्रीमती निता मिसाळ ,सहा पोलीस आयुक्त ला.प्र.वि. पुणे
तपासी अधिकारी-श्री सुहास हट्टेकर, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे

13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Suhas Suresh Avhad(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):

Rank (पद): **No.**(क्र.):

to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

ठाणे अंमलदार
संत तुकाराम नगर, पो.ठाणे
पिंपरी चिंचवड शहर

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Suhas Suresh Avhac
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): PI

Submitted 29/10/2026

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Scanned with CamScanner

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the (If known / seen)**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

S.No.(अ.क्र.)	Sex (लिंग)	Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष)	Build (बांधा)	Height (cms.) (उंची(सें. मी.))	Complexion (रंग)	Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा)
1	2	3	4	5	6	7
1	पुरुष					चेचक के दाग: NO

Deformities/ Peculiarities	Teeth (दात)	Hair (केस)	Eyes (डोळे)	Habit(s) (सवयी)	Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी)
8	9	10	11	12	13

Language /Dialect (भाषा / बोलीभाषा)	Place Of (का स्थान)					Others (इतर)
	Burn Mark (भाजल्याच्या खुणा)	Leucoderma (कोड)	Mole (तिळ)	Scar (व्रण)	Tattoo (गोदण)	
14	15	16	17	18	19	20

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

Scanned with CamScanner